Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 1.9508(UIF)
Volume-3, Issue-7, Jan-2014

Available online at www.aygrt.isrj.net

# "भारतातील शेतमजुरांची आर्थिक स्थिती : एक अभ्यास"

वायसे गोवर्धन कल्याण

अर्थशास्त्र विभाग, बलभिम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड

सारांश - थोडक्यात भारतातील शेतमजुरांची आर्थिक स्थिती : एक अभ्यास या विषयाचे अध्ययन केले असता. असे दिसते की, भारत हा कृषी प्रधान देश आहे. भारतातील जवळपास ७०% लोक कृषी क्षेत्रावर अवलंबुन आहेत. शेतमजुरांना मिळणारा हंगामी रोजगार, अल्पमजुरीदर राहणीमानाचा दर्जा, प्रत्यक्ष कामाचे दिवस, भूमिहीन शेतमजुर  इ. यावरुन भारतीय शेतमजुरांची आर्थिक स्थिती दयनीय आहे हे स्पष्ट होते.

## प्रस्तावना-

प्राचिन काळापासुन भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला अनन्य साधारण महत्व आहे. महात्मा गांधींनी तर "शेती म्हणजे भारतीय अर्थव्यव्थेचा आत्मा आहे" असे म्हटले आहे. त्यामुळे भारत आजही कृषी प्रधान देश मानला जातो. भारतातील एकुण लोकसंख्येच्या ७०% लोकसंख्या आजुनही शेतीवरच अवलंबुन आहे. भारतीय जनतेला लागणारे अन्नधान्य आणि उद्योगांना लागणारा कच्चामाल हा शेतीद्वारेच पुरवला जातो. त्यामुळे शेतीला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असे म्हणतात.[१] शेती क्षेत्रामध्ये काम करणारा मजुर हा भारतीय अर्थव्यवस्थेचा एक विभिन्न व महत्वपूर्ण घटक आहे. परंतु हा घटक विकासाच्या प्रक्रियेमध्ये दुर्लक्षीत राहिला आहे.

नियोजन मंडळाच्या मते "शेतमजुराचा प्रश्न म्हणजे नि:संदिग्ध आव्हानच आहे". दुसऱ्या एका ठिकाणी अभिप्राय देताना नियोजन मंडळाने म्हटले आहे की, "शेतमजुरांचा प्रश्न हा भारतीय अर्थव्यवस्थेतील चिघळलेली एक जखम आहे". शेतमजुरांच्या प्रश्नासंदर्भात भूतपूर्व राष्ट्रपती श्री.संजिव रेड्डी यांनी देखील मत व्यक्त केले आहे. त्यांच्या मते "भारतातील शेतमजुरांचा प्रश्न हा धुमसणारा ज्वालामुखी आहे".[२]

भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेत शेतमजुराचे स्थान अत्यंत महत्त्वपुर्ण जरी असले तरी कृषी उत्पादनामध्ये महत्त्वपुर्ण भूमिका निभावणाऱ्या या घटकाची आर्थिक स्थिती अतिशय दयनिय व चिंताजनक आहे. शेतमजुर ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये सर्वाधीक मागे, सर्वाधिक शोषीत वर्ग आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास साधावयाचा असेल तर शेतमजुरांच्या समस्याचे यशस्वी निराकरण करणे गरजेचे आहे.

## शोध निबंधाचे उद्दिष्टे :-

१) भारतातील शेतमजुरांचे प्रकार अभ्यासने.
२) भारतातील शेतमजुरांच्या वाढीचा अभ्यास करणे.
३) भारतातील शेतमजुरांच्या मजुरीदराचा अभ्यास करणे.
४) भारतातील शेतमजुरांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

## शोध निबंधाची गृहीते :-

१) भारतात शेतमजुरांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे.

२) भारतातील शेतमजुरांची आर्थिक स्थिती कमकुवत आहे.

संशोधन पध्दती :-

प्रस्तुत शोध निबंधामध्ये विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केला असुन शोधनिबंधातील विवेचन दुय्यम साधन सामग्रीवर अवलंबुन आहे. यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, अहवाल, वृत्तपत्रे, संकेतस्थळ (वेबसाईट) इत्यादींचा उपयोग केला आहे.

अभ्यास विषयाचे महत्व :-

भारतीय अर्थव्यवस्था कृषी क्षेत्रावर अवलंबुन आहे. आज जागतीकीकरणाच्या प्रवाहात देखील भारतातील ७०% लोकसंख्या कृषी क्षेत्रावर अवलंबुन आहे. कृषी उत्पादनाच्या प्रक्रियेमध्ये शेतमजुर हा एक अविभाज्य घटक आहे. परंतु पूर्वीपासुन या घटकाकडे दुर्लक्ष होत गेले आहे. त्यामुळे या घटकावर संशोधन होणे गरजेचे वाटते म्हणून शोध निबंधासाठी "भारतातील शेतमजूरांची आर्थिक स्थिती : एक अभ्यास" हा विषय निवडण्यात आला आहे.

शेतमजुरांचे प्रकार :-

भारतातील शेतमजुरा जवळ असणाऱ्या जमिनीच्या क्षेत्रावरुन तसेच शेतमजुरांच्या काम करण्याच्या पध्दतीवरुन शेतमजुरांचे प्रकार पडतात.

१) भूमिहीन शेतमजुर :-

प्रत्येक देशात शेतमजुरांचा एक स्वतंत्र वर्ग असतो. त्यामुळे शेतजमीनीवर मालकी नसलेल्या आणि उपजिवीकेसाठी इतरांच्या जमिनीवर काम करणाऱ्या मजुरांना भूमिहीन शेतमजुर असे म्हणतात. भारतातील कृषी अर्थव्यवस्थेत या मजुरांचे स्थान सर्वात खालच्या दर्जाचे आहे. सध्यस्थितीत भूमिहीन शेतमजुरांची समस्या अत्यंत गुंतागुंतीची झाली आहे.[3]

२) भूमिधारी शेतमजुर :-

ज्या शेतमजुराजवळ स्वतःच्या मालकीची जमिन असते, अशा शेतमजुरांना भूमिधारी शेतमजूर असे म्हणतात. भूमिधारी शेतमजुराजवळ शेतजमीन असली तरी अनेकदा ही जमिन साधनाच्या अभावामुळे लागवडीखाली आणली जात नाही. शेतमजुराजवळ असलेली सर्व जमिन लागवडीखाली आणली गेली तरी या जमिनीचे क्षेत्र अगदी थोडे असल्यामुळे अशा मजुरांना इतरांच्या जमिनीवर घाम गाळण्याशिवाय गत्यांतर नसते.[४]

३) जोडलेला शेतमजुर :-

जे शेतमजुर हे शेतमालकाकडे महिना किंवा वर्षाचा करार करुन त्यांच्या शेती व्यवसायात काम करीत असतात. त्यांना जोडलेला शेतमजुर असे म्हणतात.

**४) रोजंदारी शेतमजुर :-**

दैनंदीन मजुरीचा करार करुन ज्यांना शेतजमिनीवर काम करण्यासाठी नियुक्त केले जाते. त्यांना रोजंदारी शेतमजुर असे म्हणतात. सध्यस्थितीत भुमिहीन किंवा अल्पभुधारक शेतमजुर देखील रोजंदारीच्या कामानुसार इतरांच्या शेतजमिनीवर काम करतात. शेतमालक आपल्या शेतीतील कामे करुन घेण्यासाठी गरजेनुसार रोजंदारी मजुर लावतात.

५) लिंगभेदानुसार शेतमजुर

शेती व्यवसायात काम करणाऱ्या शेतमजुरांना लिंगभेदाप्रमाणे वर्गीकृत केले जाते. आपल्या मालकिच्या जमिनीवर अंगमेहनतीचे काम करुन घेण्यासाठी शेतमालक, पुरुष मजुरांना कामावर ठेवतात. तसेच कमि शारिरीक श्रमाची कामे करण्यासाठी स्त्री मजुरांना नियुक्त केले जाते. त्याचप्रमाणे १५ वर्षाच्या आतील मुलांना शेती संबंधीची विविध कामे करण्यासाठी बाल मजुर म्हणून कमी मजुरीवर कामावर ठेवले जाते. आधुनिक काळात ग्रामीण भगातील लोकांमध्ये जागृती झाल्यामुळे तसेच बाल मजुरांच्या नियुक्तीवर कायदेशीर प्रतिबंध असल्यामुळे बाल मजुरांचे प्रमाण कमी झाले आहे.[५]

भारतातील शेतमजुरांची संख्या :-


प्रत्येक देशात शेतमजुराचा एक स्वतंत्र वर्ग अस्तीत्वात असतो. शेतमजुराच्या या वर्गाचा आकार देशाची लोकसंख्या, लोकसंख्या वाढीचा दर, शेतीवर अवलंबुन असणाऱ्या लोकसंख्येचा भाग, शेतीची स्थती, शेतीमध्ये करण्यात येणाऱ्या विज व यंत्राचा उपयोग ग्रामीण भागात जनतेला उपलब्ध असलेल्या सोयी, नागरीकरणाची प्रक्रिया अशा अनेक बाबींवर अवलंबुन असतो. स्वातंत्र्यापुर्वी भारतात शेतमजुरांचे प्रमाण अतिशय अल्प होते.

तक्ता क्र.- १
भारतातील शेतमजुरांची संख्या
(दश लक्षामध्ये)

| अ.क्र. | वर्ष | एकुण लोकसंख्या | शेतमजुर |
|---|---|---|---|
| १ | १९५१ | ३६१.१ | २७.३ |
| २ | १९६१ | ४३९.२ | ३१.५ |
| ३ | १९७१ | ५४१.२ | ४७.५ |
| ४ | १९८१ | ६९३.३ | ५८.५ |
| ५ | १९९१ | ८४६.४ | ७४.६ |
| ६ | २००१ | १०२७.० | १०६.८ |
| ७ | २०११ | १२१०.० | १६७.८ |

Source : A glance at the producer farmars and form labours data from 2011 census

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 1.9508(UIF)
Volume-3, Issue-7, Jan-2014 Available online at www.aygrt.isrj.net




वरील तक्ता क्र. १ व आलेख क्र. १ वरुन असे दिसनु येते की, सन १९५१ मध्ये भारतातील लोकसंख्या ३६१.१ दश लक्ष होती त्यामध्ये वाढ होऊन सन १९८१ मध्ये ६९३.३ दश लक्ष झाली तर सन २०११ मध्ये १२१०.० दश लक्ष एवढी झाली आहे. तसेच सन १९५१ मध्ये शेतमजुरांची संख्या २७.३ दशलक्ष एवढी होती त्यामध्ये वाढ होऊन सन १९८१ मध्ये ५८.५ दशलक्ष एवढी झाली. तर यामध्ये झपाट्याने वाढ होऊन सन २०११ मध्ये ही संख्या १६७.८ दशलक्ष एवढी झाली आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, देशाची लोकसंख्या वाढत असतांना भारतातील शेतमजुरांची संख्या देखील झपाट्याने वाढत आहे.

भारतातील शेतमजुरांची आर्थिक स्थिती :-

भारतातील शेतमजुरांची आर्थिक स्थिती औद्योगिक क्षेत्रातील मजुरांपेक्षा दयनिय आहे. औद्योगिक क्षेत्रातील कामगार संघटीत असल्यामुळे त्यांना वेतनवाढ व इतर मागण्या मान्य करुन घेता येतात. रोज काम मिळेल हि त्यांना शाश्वती असते. परंतु शेतमजुरांचे तसे नसते. शेतमजुर असंघटित असल्यामुळे त्यांची सौदाशक्ती कमि असते. त्यांना अतिशय अल्प वेतन मिळते. तसेच अनेक दिवस रोजगार मिळत नाही. भविष्य निर्वाह निधी, विमायोजना, अपघात प्रसंगी मदत, साप्ताहिक सुट्टि, अशा सवलती शेतमजुरांना मिळत नाहीत.[६]

काही घटकाच्या आधारे भारतातील शेतमजुरांची आर्थिक स्थिती स्पष्ट होते.

**१) मजुरीचा दर :-**

इतर मजुरांच्या तुलनेमध्ये शेतमजुरांना त्यांच्या कामाबद्दल अत्यल्प मोबदला मिळतो. पहिल्या शेतमजुर चौकशीच्या अहवालानुसार (१९५०-५१) पुरुष, स्त्री व मुलांना दररोज मिळणाऱ्या मजुरीचा दर अनुक्रमे १०९ पैसे, ६८ पैसे व ७० पैसे होता.

दुसऱ्या शेतमजुर चौकशी समितीच्या अहवालानुसार (१९५६-५७) अनुक्रमे ९६ पैसे, ५९ पैसे, व ५३ पैसे होता. यावरुन शेतमजुरांना मिळणारा मोबदला हा अल्प आहे हे स्पष्ट होते.[७]

सन १९८७ मध्ये श्रम मंत्रालयाने यामध्ये वाढ करुन मजुरीचा दर १५ रु. एवढा केला. डिसेंबर १९९८ मध्ये भारत सरकारने सर्व राज्य आणि केंद्रशासीत प्रदेशासाठी शेतमजुरीचा दर ४० रु. प्रतिदिन एवढा ठरवुन दिला. तसेच सन २०१०-११ साली शेतमजुराचा दर १५० रु. एवढा झाला आहे. परंतु सर्वच आवश्यक वस्तुंच्या विशेषतः अन्नधान्याचा किमती सातत्याने भरमसाठ प्रमाणात वाढत असल्याने शेतमजुरांची स्थिती अलीकडील काळात अधिक खालवली आहे.[८]

२) भूमिहीन शेतमजुर :-

खेड्यात राहणाऱ्या कुटूंबाजवळ जमिनीचा लहानसा तुकडा जरी असला तरी तो त्यांच्या आर्थिक जिवनाचा आधार असतो. दुसऱ्या शेतमजुर चौकशी समितीच्या अहवालानुसार १९५६-५७ मध्ये संपूर्ण देशात शेतमजुरांची जेवढी कुटूंबे होती त्यापैकी ५८.४% कुटुंबे भूमिहीन होती. १९६३-६४ मध्ये भूमिहीन शेतमजुर कुटूंबाचे प्रमाण ६१.२% होते. सन २००१ मध्ये भूमिहीन शेतमजुराच्या कुटूंबाचे प्रमाण ८०% होते.[९] शेतमजुरांची बहुतांशी कुटूंबे भूमिहीन असतात. या झाडांची मुळे खोलवर गेलेली नसतात अशी झाडे वादळात अगदी प्रथम उन्मळुन पडतात त्याप्रमाणे भूमिहीन कुटूंबाची स्थीती या झाडांसारखीच असते.

२) प्रत्यक्ष कामाचे दिवस :-

शेतमजुरांना अपुरा रोजगार मिळत असल्याने त्यांना वर्षातील बरेच दिवस कामावाचुन राहावे लागते आणि या बेकारीच्या काळात दुसरीकडे रोजगार मिळवण्यास ते असमर्थ असतात. आपल्या देशातील शेतमजुरांना वर्षात किती दिवस राजेगार मिळतो व किती दिवस त्यांना बेकार रहावे लागते. याबाबतीत अधिकृत आकडेवारी उपलब्ध आहे. पहिल्या शेतमजुर चौकशी समितीच्या अहवालानुसार १९५०-५१ मध्ये पुरुष मजुराला वर्षात सरासरीने २०० दिवस आणि स्त्री मजुरांना १४१ दिवस काम मिळत असे. दुसऱ्या शेतमजुर चौकशी समितीच्या अहवालानुसार १९५६-५७ मध्ये पुरुषाला प्राप्त होणाऱ्या रोजगारीचा काळ सरासरीने १९७ दिवस व स्त्री मजुरांचा रोजगारीचा काळ १३४ दिवस होता. एका विशेष चौकशी पाहणीनुसार असे निदर्शनास आले की, १९६५ मध्ये सरासरी कामाचे दिवस २७७ होते ते १९७४-७५ मध्ये कमी होऊन २५० दिवस पर्यंत झाले.[१०] सातव्या शेतमजुर चौकशी समितीच्या अहवालानुसार (१९९९-२०००) शेतमजुराला २२२ दिवस काम मिळते.

यावरुन शेतमजुरांच्या प्रत्यक्ष कामाच्या दिवसात घट होत आहे. असे दिसुन येते शेतमजुरांना वर्षभर काम मिळत नसल्यामुळे ते आपले उत्पन्न वाढविण्याकरीता कितीही उत्सुक असले व कोणतेही काम करण्याची त्यांची तयारी असली तरी आजच्या या परिस्थितीत त्यांना आशेचा किरन दिसु शकत नाही. त्यामुळे शेतमजुरांची आर्थिक स्थिती कमकुवत आहे.

३) रहाणीमानाचा दर्जा ः

शेतमजुरांना मिळणारे अल्प वेतन, अपूर्ण रोजगार यामुळे शेतमजुरांच्या जीवनावश्यक गरजाही पूर्ण होऊ शकत नाहीत. किमान जिवनमान पातळी गाठण्यासाठी आवश्यक तेवढे उतपन्नही त्यांना मिळत नाही. दुसऱ्या शेतमजुर चौकशी समितीला असे आढळुन आले की, शेतमजुरांच्या कुटूंबाचा किमान उपभोग आणि उत्पन्न यात १८० रु. ची तुट पडते. शेतमजुरांना आपल्या उत्पन्नातुन आपल्या कुटूंबीयांच्या दैनंदिन गरजा पूर्ण करणे शक्य होत नाही. म्हणून त्यांच्या लहान मुलांनाही शेतात रोजंदारीवर पाठवावे लागते. घरातील सर्व सदस्यांनी काम करुनही निकृष्ट प्रतिचे जिवन जगावे लागते.[११]

**4)** कर्जबाजारीपणा –

मजुरीचा अल्पदर, अनियमित व मोसमी स्वरुपाचा रोजगार आणि परंपरेने मिळालेला दारिद्रयाचा वारसा या कारणामुळे शेतमजुरांना कर्ज घेण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो. भारतात सर्वात मोठ्या संख्येमध्ये शेतमजुर कर्जबाजारी आहेत. १९५०-५१ मध्ये भारतात ४४.५% शेतमजुर कुटुंब कर्जबाजारी होते. सहा वर्षात यामध्ये वाढ होऊन सन १९५६-५७ मध्ये कर्जबाजारी शेतमजुरांच्या परिवारांचे प्रमाण ६३.९% झाले. सन २०००-०१ मध्ये कर्जबाजारी शेतमजुरांच्या परिवारांचे प्रमाण ८०% होते.

शेतमजुरांच्या कर्जबाजारीपणामध्ये वाढ होण्याचे एक प्रभावी कारण म्हणजे शेतमजुर बहुतांश कर्ज अनुत्पादक कार्यासाठी वापरतात. यामध्ये लग्न, उत्सव, धार्मिक संस्कार यासाठी वापरण्यात आल्याचे दिसते व हे कर्ज विशेषत: गावातील महाजन किंवा सावकर यांच्या कडून घेतले जाते. त्यामुळे गांर्भीयाची बाब म्हणजे शेतमजुर हा केवळ कर्जबाजारी नसुन त्याच्या कर्जबाजारी प्रमाणामध्ये वाढ होत आहे व त्याच्या जिवनावरील सावकार, महाजनांची पकड आधिकाधीक मजबुत होत आहे.

निष्कर्ष :-

१) भारतातील शेतमजुरांचे पाच प्रकार पडतात. त्यामध्ये अनुक्रमे भुमिहीन शेतमजुर, भुमिधारी शेतमजुर, जोडलेला शेतमजुर, रोजंदारी शेतमजुर, लिंगभेदानुसार शेतमजुर इ. होय.
२) भारतातील शेतमजुरांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. सन १९५१ मध्ये भारतातील शेतमजुरांची संख्या २७.३ दशलक्ष एवढी होती त्यामध्ये सातत्याने वाढ घेऊन सन २०११ मध्ये ही संख्या १६७.८ दशलक्ष एवढी झाली आहे.
३) भारतातील शेतमजुरांच्या मजुरिचा दर हा अतिशय अल्प आहे. सन १९५१ मध्ये मजुरीचा दर १.०९ रु. एवढा होता. तर त्यामध्ये अल्पशी वाढ होऊन सन २०११ मध्ये १५० रु. एवढा झाला तो आजच्या जागतीकीकरणाच्या युगामध्ये अतिशय अल्प आहे. त्यामुळे शेतमजुरांची आर्थिक स्थिती दयनिय आहे.
४) भारतामध्ये भुमिहीन शेतमजुरांचे प्रमाण जास्त आहे. सन १९५६-५७ मध्ये संपूर्ण देशात शेतमजुरांची जेवढी कुटुंबे होती त्यापैकी ५८.४% कुटुंबे भुमिहीन होती. त्यामध्ये वाढ होऊन सन २००१ मध्ये ८०% कुटुंबे भुमिहीन होते. यावरुन असे स्पष्ट होते की, भारतामध्ये भुमिहीन शेतमजुरांचे प्रमाण जास्त आहे.
५) भारतातील शेतमजुरांच्या कर्जबाजारीपणा मध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे.
६) भारतातील शेतमजुरांचे उत्पन्न अल्प असल्यामुळे त्यांचा राहणिमानाचा दर्जा देखील निकृष्ट आहे.
७) भारतातील शेतमजुरांचे प्रत्यक्ष कामाचे दिवस दिवसेंनदिवस कमी होत आहेत. म्हणजेच शेतमजुरांना मिळणारे वेतन देखील कमी होत आहे.

**शिफरशी :-**

१) शेतमजुरांच्या कामाचे तास निश्चित करणे.
२) सन १९४८ च्या किमान मजुरी कायद्याची ग्रामीण भागामध्ये प्रभावी अंमलबजावणी करणे.
३) शेतमजुरांना कर्जपुरवठ्यासाठी शेतमजुर सहकारी संस्थाची स्थापना करणे.
४) भुमिहीन शेतमजुरांना जमिनीचे वितरण करणे.
५) रोजगारा संबंधी विशेष कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करणे.

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 1.9508(UIF)
Volume-3, Issue-7, Jan-2014
Available online at www.aygrt.isrj.net

संदर्भ ग्रंथ :-

१) कानेटकर मेधा, भारतीय अर्थशास्त्र (२०१२); श्री साईनाथ प्रकाशन नागपुर, पृ.क्र.६५.
२) देशमुख प्रभाकर, भारताची अर्थव्यवस्था; पिंपळापुरे ॲण्ड कं.पब्लिशर्स, नागपुर.
3) बोधनकर सुधिर, चव्हाण साहेबराव, श्रम अर्थशास्त्र (2012); श्री साईनाथ प्रकाश नागपुर, पृ.क्र. 230.
4) देशमुख प्रभाकर, श्रमाचे अर्थशास्त्र; विद्या प्रकाशन, नागपुर पृ.क्र. 318
5) बोधनकर सुधिर, चव्हाण साहेबराव, श्रम अर्थशास्त्र (2012), उपरोक्त,पृ.क्र. 231.
6) वाणी निता, कृषी अर्थशास्त्र (2012); प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव, पृ.क्र.133.
7) देशमुख प्रभाकर, श्रमाचे अर्थशास्त्र; उपरोक्त पृ.क्र. 319.
8) देसाई, भालेराव, भारतीय अर्थव्यवस्था (2012); निराली प्रकाशन, पुणे, पृ.क्र.183.
9) दत्त एंव सुंदरम, भारतीय अर्थव्यवस्था (2013); एस.चंन्द ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नई दिल्ली, पृ.क्र. 858.
10) फडणवीस मृणालीनी, देशपांडे प्राची, श्रम अर्थशास्त्र; पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपुर पृ.क्र. 165.
11) वाणी निता, कृषी अर्थशास्त्र (2012); उपरोक्त, पृ.क्र.133.